लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय
फक्त ५१०००/- रु.
जेवणासह (अटी लागू)
• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय
श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११



दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com



कंट्रक्शन
आमच्याकडे कमर्शियल रेसिडेंशियल बंगलोज अपार्टमेंट दर १६५० चौ. फुटप्रमाणे मटेरियलसह लॉक अँड की प्रोजेक्ट करून दिले जातील. संकल्प इंजीनियर्स
मो. ९३७१५२३९३९



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक ५५ वा | सोमवार, दि. १६ सप्टेंबर २०२४ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# बहूजनांच्या डोक्याला झालेला भटशाहीचा कॅन्सर कधी बरा होणार ?


**दत्तकुमार खंडागळे**
मो.956551006


बहूजन समाजाचे प्रबोधन करत करत कित्येक लोक खपले. एकेकाने आपले आयुष्य पणाला लावले. सर्व सतांनी या येड्याच्या कानी-कपाळी ओरडून ओरडून सांगितले. महाराष्ट्राच्या मातीत झालेल्या संतांच्या मांदियाळीने या लोकांना हरत-हने समजावले पण अजूनही बहूजन समाजाचं मस्तक सुधारलेलं नाही. अजूनही त्याच्या धडावर त्याचे मस्तक आलेले नाही. त्याच्या डोक्यात ठाण मांडून बसलेला भट अजूनही संपलेला नाही. या मानसिक रोग्यांना कधी जाग येणार की नाही ? बहूजनांच्या अजून किती पिढ्या अशाच मानसिक गुलामीत संपणार आहेत ? हा प्रश्न सतत अस्वस्थ करत राहतो. हे चित्र पाहिलं की संतानी आपलं जीवन या लोकांसाठी व्यर्थ का घालवलं असेल ? असा प्रश्न पडतो. संत तुकाराम, संत सावता माळी, सत सेना, संत चोखोबा, संत जनाई, मुक्ताई, संत गाडगेबाबा अशा मांदीयाळीने आपले अखंड आयुष्य वेचले. कैक संतांनी तर या येड्या-भाबड्या बहूजन समाजासाठी बलिदान दिले तरीपण हा समाज असाच येडा आहे ? तरीही तो मुखार्सारखा भटशाहीला कवटाळून का बसतो ? हा प्रश्न अस्वस्थ करून सोडतो. बहूजनांच्या मेंदूत असला कसला लोचा आहे की त्याला भटाशिवाय जमतच नाही ?

परवा एका शाळेत पालक मिटीगसाठी जायचा योग आला होता. सदर पालक मिटींगमध्ये एका विद्यार्थ्याला त्याच्या वर्ग शिक्षकांनी विचारले की, "तु परिक्षेला का आला नव्हता ? दोन पेपर बुडवलेस, कुठे होतास ? यावर त्या विद्यार्थ्याने जे उत्तर दिले ते भयंकर होते. बहूजनांच्या 'मती'ची 'माती' कशी झाली आहे ? याचा अस्सल पुरावा देणारे ते उत्तर होते. सदर विद्यार्थ्याने सांगितले की, "माझी शांती करायची होती म्हणून मी परिक्षेला आलो नव्हतो. घरचे मला शांती करण्यासाठी घेवून गेले होते !" त्याचे हे उत्तर ऐकल्यावर मला हजार विंचू एकाचवेळी डसावेत तसं झालं. त्याचे उत्तर खुप अस्वस्थ करून गेले.

विद्येवीना मती गेली ।
मतीवीना निती गेली ।
नितीवीना गती गेली ।
गतीविना वित्त गेले ।
वित्ताविना शुद्र खचले इतके
अनर्थ एका अविद्येने केले।

असं महात्मा फुलेनी लिहीलं आहे. पण त्यांनाही या शिक्षीत असलेल्या बावळट बहूजन समाजाने चुकीचे ठरवले आहे. या भाबड्या बहूजन समाजाला विद्या मिळावं म्हणून महात्मा फुले आणि सावित्रीमाय फुलेंनी आयुष्य वेचले. स्वतःचे अवघे जीवन पणाला लावले. विद्या घेवूनही हा समाज मानसिक गुलामीतून बाहेर पडायला तयार नाही. महात्मा फुलेंना काय वाटलं असतं आज ? पोराची परिक्षा सोडून त्याचे आई-बाप त्याला शांती करायला घेवून जातात. त्याचे दोन पेपर बुडवून शांती केली जाते. हा प्रकारच भयंकर आहे. आजही हे घडावं ? भटांना काय दोष द्यायचा ? शांतीसाठी हजारो रुपएची माती करतात, भटाची भरती करतातच पण त्यासाठी पोरांच्या शिक्षणाचीही माती करावी ? भटांना इतकं कळत असतं, देव, ग्रह त्यांच्या अंकीत असते तर त्यांनी चड्डीला नाड्या आणि बटनं लावली नसती ना ? स्वतःच्या कमरेची चड्डी ज्यांच्या अंकीत रहात नाही अशा शेंबड्यांना ग्रह शांत करता येतील का ? त्यांनी कुठल्यातर नदीकाठी पुटपुटून ग्रह शांत होतो का ? घरात बायको त्यांना चोपते हे तिला शांत करू शकत नाहीत आणि ग्रह कसे शांत करणार ? पण अंधश्रध्देची भांग प्यायलेल्या बहूजनांना अकला कधी येणार ? हा खरा प्रश्न आहे.



सांगली जिल्ह्यातील भिलवडीजवळ औदूंबर येथे माझ्या एका मित्राचे घर आहे. त्याचे घर अशाच एका भटजीने भाड्याने घेतले होते. एके दिवशी सदर मित्राच्या घरी गेल्यावर त्याने जी माहिती दिली ती इथं जशीच्या तशी देतो. त्याच्या घरी राहिलेल्या भटजीकडे शांती करायला खुप लोक यायचे. त्याने शांतीसाठी मांडलेला पाट अनेक वर्षे बदलला नव्हता. तो पाट व त्या पाटावरील साहित्य सर्व प्रकारच्या शांतीसाठी तो वापरत होता. ग्राहक बदलत होते, शांतीचे प्रकार बदलत होते पण पाटावरचे साहित्य मात्र कधीच बदलत नव्हते. कित्येक तरूणांची लग्न ठरत नाहीत म्हणून ते शांती करायला या भटाकडे यायचे व शांती करून जायचे. विशेष म्हणजे जो भट शांती करायला आलेल्यांची लग्न व्हावे म्हणून शाती करत होता पण त्याचेच वय उलटले तरी लग्न झालेले नव्हते. पण शांती करता करता त्याने बक्कळ माया छापली होती. शांतीच्या जीवावर त्याने एका वर्षात साठ लाखाची एक आणि चाळीस लाखाची एक अशा दोन गाड्या खरेदी केल्याची माहिती मला त्या मित्राने दिली. आता यात भटाला काय दोष द्यायचा ? तो त्याचे दुकान मांडून बसलाय. जायचं की नाही ती ग्राहकाची इच्छा. तो थोडाच नरडीला दोर लावून नेतो की डोक्याला रिव्हॉल्वर लावून नेतो ? आम्हालाच इतकी खाज की भट आल्याशिवाय आमचं पान हलत नाही. ते किती बी येड असलं तरी आमचं हे येडं त्याच्या पायाचं तिर्थ पितंच. त्याच्या पायाच्या तिथार्च आचमन करतच. त्या शिवाय याचे पोटच साफ होत नाही. आई मेली भट हवा, बाप गेला भट हवा, लग्न केलं भट हवा, घर बांधलं भट हवा, दुकान चालू केलं भट हवा, लग्न ठरवायचय तर भट हवा. मुलगी-मुलगा पहायला जायचय तर भट हवाच. पत्रिका पाहिलीच पाहिजे. लग्नाची तारीख ठरवायची आहे तरी भट हवाच. कुठे जायचय, मुहूर्त काढायचाय तर भट पाहिजेच. त्याच्याशिवाय आमच्या लोकांचे पान हलत नाही. त्यांचा कुठलाच कार्यक्रम भटाशिवाय होत नाही. फक्त पोरं जन्माला घालायलाच अजून भटाची गरज वाटत नाही. हा एकच विभाग सोडला तर आपल्या लोकांना सर्वत्र भट हवाच असतो. त्याच्याशिवाय आमचे पान हलत नाही. डॉक्टरांच्यात जसा 'कट प्रॅक्टीस' प्रकार असतो तसाच इथे पण असतो. शांती सुचवणा-यांचे कमीशन असते. शांती करणारा भट शांतीच्या नावाखाली हजारो रूपयांचा चुना लावतो. ज्याने शाती सुचवली व शांतीसाठी पाठवले त्यालाही कमीशन दिले जाते. ही साखळी आहे आणि या साखळीचा हा धंदा खुप तेजीत आहे. शिकले-सवरलेले मुर्ख लोकही या गोष्टी करतात हे पाहून दुःख होतं.

आजही बहूजन समाज असाच मुखार्सारखा वागतो ? आजही भटांच्या कपोलकल्पीत थोतांडाला कवटाळून जगतो. त्याला योग्य काय, अयोग्य काय ? हे कळत नाही ? या येड्यांना समजवता समजवता किती महापुरूष खपले ? कित्येकांनी जीव गमावले. कित्येकांचे भटांनीच मुडदे पाडले. महात्मा बसवेश्वर मारले, संत कबीर मारले, संत तुकाराम मारले. तुकोबारायांचा तर या भडव्यांनी खून केला आणि ते सदेह वैकुठाला गेल्याची थाप ठोकून दिली. आमच्या येड्या भाबड्या बहूजन समाजाला ती खरी वाटली. विशेष म्हणजे आजही विद्नान युगात ही थाप खरी वाटते. तुकारामांचा खून झाला होता म्हंटले तर कैक येडे अंगावर येतात. ते सदेह वैकुठलाच गेल्याचे ठासून सांगतात. आमचे लोक शिकले-सवरले पण भटशाहीने नासलेला त्यांचा मेंदू सरळ झालाच नाही. शिक्षणानेही त्यांच्या मेदूला चढलेला अंधश्रध्देचा गंज निघाला नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाला "वाघिणीचे दुध" म्हंटले पण बहूजन समाजाने त्यांना चुकीचे ठरवत शिक्षणाला नागिनीचे विष बनवले. प्रबोधन करणा-या संतांचे भटशाहीने खून पाडले. ही खुनाची परंपरा आजतागायत चालू आहे. पानसरे, दाभोळकरांच्या पर्यंत हे खूनसत्र आलय. प्रबोधन करणा-या लोकांचे मुडदे पाडण्याचे सत्र आजही सुरूच आहे. तरीही बहूजन समाजाच्या डोक्याला झालेला भट नावाचा कॅन्सर बरा व्हायला तयार नाही. अजून किती महापुरूष पचवणार आम्ही ? त्यांना पचवून मुर्खपणाच्या करपट ढेकरा अजून किती पिढ्या देणार आहोत ? हा खुप अस्वस्थ करणारा प्रश्न आहे.

# मनोज जरांगे पाटील आणि आ. राजेंद्र राऊत या दोन्ही मराठ्यातील वैचारीक मतभेद मिटावा यासाठी मराठा क्रांती मोर्चाचा पुढाकार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील हे मराठा समाजाला ओबीसी मधून सगेसोयरे यासह आरक्षण मिळावे या मागणीसाठी लढा देत आहेत. आता ही आरक्षणाची लढाई अंतिम टप्प्यात आली आहे. दरम्यान बार्शीचे भाजप पुरस्कृत आमदार राजेंद्र राऊत यांनी आपल्या पद्धतीने भूमिका घेतली.





मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील आणि बार्शीचे आमदार राजेंद्र राऊत या दोन्ही मराठ्यातील वैचारीक मतभेद मिटावा यासाठी मराठा क्रांती मोर्चातील ज्येष्ठ समन्वयक दिलीप कोल्हे, दास शेळके, सुनील रसाळे यांनी पुढाकार घेत मनोज जरांगे पाटील आणि आमदार राजेंद्र राऊत यांची भेट घेऊन सत्य परिस्थिती आणि वस्तुस्थिती याची मांडणी केली.

दोन्ही मराठा बांधवांची भूमिका एकच आहे गरजवंत मराठ्यांना ओबीसीतून सगे सोयऱ्यांसह आरक्षण मिळावे त्या दृष्टिकोनातून वाटचाल ही सुरू आहे. आज मराठा क्रांती मोर्चाच्या समन्वयकांनी जालना अंतरवली सराटी येथे मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील आणि बार्शी येथे आमदार राजेंद्र राऊत यांची भेट घेऊन एकोपा घडवण्यासाठी प्रयत्न केला आणि दोघांनीही यासाठी सकारात्मकता दर्शवली.

यावेळी मराठा क्रांती मोर्चा चे समन्वयक दिलीप कोल्हे यांनी समाज बांधवांनी एकमेकांवर टीकात्मक भाष्य करू नये एकोप्याने राहावे आणि आपली आरक्षणाची गरजवंत मराठ्यांची लढाई यशस्वी करावी असे आवाहन केले.

यावेळी मराठा क्रांती मोर्चा चे ज्येष्ठ समन्वयक दास शेळके, सुनिल रसाळे, विजय पोखरकर, बाळासाहेब सुरवसे उपस्थित होते.

# सोलापुरात कांदा साडेपाच हजारांवर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** केंद्र सरकारने कांद्यावरील निर्यातबंदी उठविली आहे. त्यामुळे सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शनिवारी (दि. 14) प्रतिक्विंटल कांद्याला साडेपाच हजारांचा भाव मिळाला आहे.



भाव चांगला मिळाल्याने शेतकर्यांतून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

बाजार समितीमध्ये गेल्या काही दिवसांपासून कांद्याच्या भावात चढउतार होत होते. मात्र शनिवारी सर्वाधिक पाच हजार 500 रुपयांचा भाव मिळाला आहे. बाजार समितीमध्ये शनिवारी 17 हजार 456 क्विंटल कांद्याची आवक झाली आहे. सर्वाधिक दर पाच हजार 500, सरासरी दर 4200, तर सर्वात कमी दर प्रति क्विंटलला 500 रुपये मिळाला आहे. गेल्या काही दिवसांपासून बाजार समितीमध्ये व्यार्पायांकडून कांद्याला मागणी वाढली होती. त्यामुळे भाव सातत्याने वाढत होते. मात्र शासनाने अचानक कांद्यावरील निर्यातबंदी हटविल्यामुळे कांद्याच्या दरात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. यंदाच्या हंगामात कर्नाटकातून नव्या कांद्याची आवकही होत आहे. नगर जिल्ह्यातून जुना कांदा बाजारात विक्रीसाठी येत असल्याचे अडते निहाल वैरागरकर यांनी सांगितले.

**तीन दिवस लिलाव बंद**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमधील कांदा लिलाव रविवार (दि. 15), सोमवार (दि. 16) आणि मंगळवारी (दि. 17) बंद राहणार आहे. त्यामुळे शेतर्कयांनी कांदा लिलावासाठी आणू नये, असे आवाहन सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीने केले आहे.

**सोलापुरात पांढया कांद्याची आवक**

येथील बाजार समितीमध्ये पांढया कांद्याची आवक होऊ लागली आहे. त्याला चांगला दरही मिळत आहे. निर्यातबंदी उठविल्याचा सकारात्मक परिणाम पांढया कांद्याच्या दरावरही झाल्याचे दिसून आले. सोलापूरच्या बाजार समितीमध्ये माळशिरस, अकलूज या भागातून विक्रीसाठी येत आहे.

# जिल्ह्यात १९ सप्टेंबर रोजी स्वच्छता महाश्रमदान - सिईओ कुलदीप जंगम

## एक दिवस माझ्या गावाच्या स्वच्छतेसाठी मोहिम



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** स्वच्छता ही सेवा या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करा. येत्या १९ सप्टेबर रोजी जिल्ह्यात स्वच्छता महाश्रमदानाचे आयोजन करणेत साजरा करणेत आले आहे. या निमित्तीने सर्व ग्रामपंचायती मध्ये स्वच्छता महा श्रमदान होणार आहे. अशी माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिली. शिवरत्न सभागृहात जिल्ह्यातील गटसंसाधन केंद्रातील वॉश अंतर्गत अभियंते, बीआरसी व सीआरसी, डाटा एन्ट्री ऑपरेटर यांची बैठक प्रकल्प संचालक अमोल जाधव यांनी घेतली. या बैठकीत मार्गदर्शन करताना उप मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव बोलत होते. या प्रसंगी जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव, सनियंत्रण सल्लागार यशवंती धत्तुरे, जिल्हा प्रशिक्षण समन्वयक शंकर बंडगर, क्षमता बांधणी सल्लागार महादेव शिंदे, सहा. लेखाधिकारी अर्चना कणकी, जिल्हा पाणी गुणवत्ता सल्लागार दिपाली व्हटे, संवाद सल्लागार सचिन सोनवणे, प्रमुख उपस्थित होते.

**जिल्हयात १९ सप्टेंबर रोजी स्वच्छता**

स्वच्छता हि सेवा २०२४ अंतर्गत महाश्रमदान अंतर्गत एक दिवस माज्या गावाच्या स्वच्छतेसाठी देणे साठी ठिकाणे निश्चित करणेत येणार आहेत. स्वच्छ भारत मिशन-ग्रामीण व शहरी यांच्या संयुक्त विद्यमानने, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून दि.२ ऑक्टोबर हा दिवस स्वच्छ भारत दिवस (SBD) म्हणून साजरा केला जातो. त्या निमित्ताने स्वच्छता ही सेवा (SHS) २०२४ मोहिम दि. १७ सप्टेंबर २०२४ ते दि.२ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत राबविण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. या वर्षीच्या स्वच्छता ही सेवा २०२४ साठी "स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता" ही थीम निश्चित केली आहे.

त्या अनुषंगाने याचाच एक भाग म्हणून प्रथम प्राधान्याने धार्मिक व अध्यात्मिक स्थळे, पर्यटन स्थळ, ऐतिहासिक वास्तू, संस्थात्मक इमारती, वारसा स्थळे, नदी, समुद्र किनारे, कार्यालय, व्यवसायिक व बाजारपेठे, सार्वजनिक वाहतुक केंद्रे, व अभयारण्ये परिसरात स्वच्छता करण्याकरीता जिल्हयातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये दि.१९ सप्टेंबर २०२४ रोजी महाश्रमदान एक दिवस माज्या गावाच्या स्वच्छतेसाठी हे विशेष मोहिम राबविण्यात येणार असल्याचे प्रकल्प संचालक अमोल जाधव यांनी सांगितले.

**सर्व ग्रामपंचायतींनी नोंद होणार - उप मुकाअ शेळकंदे**

ग्रामपंचायतींचा ६० टक्के निधी हा पाणी व स्वच्छते साठी राखीव ठेवणेत आला आहे. ज्या ग्रामपंचायती सहभागी होणेस टाळाटाळ करतील अशा ग्रामपंचायतींची नोंद घेतली जाणार असल्याची माहिती उप मुख्य कार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे यांनी दिली. संबंधित विस्तीर अधिकारी व ग्रामसेवक यांना जबाबदार धरणेत येईल. असेही शेळकंदे यांनी सांगितले.

- जिल्ह्सात ११२३ गावात ही स्वच्छता मोहिम
- सर्व अस्वच्छ जागांचे जिओ टॅगींग करणेत येत आहे
- संपूर्ण जिल्ह्यात ३४५७ स्थळांची स्वच्छता मोहिम
- प्रत्येक स्थळाचे दोन फोटो केंद्र शासनाचे संकेतस्थळावर अपलोड होणार
- सफाई कामगारांचे आरोग्य तपासणी साठी नोंदची सुरूवात
- ऐतिहासिक स्थळांची स्वच्छता मोहिम

# सोलापूरकरांसाठी मोठी गुडन्यूज !

## २ आठवड्यांत सुरु होणार विमानसेवा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूरकरांसाठी मोठी गुडन्यूज आहे. मागील काही दिवसांपासून जिल्ह्यातील विमानसेवा सुरु करावी, अशी मागणी जोर धरत होती. याच पार्श्वभूमीवर आता सोलापूर विमानतळ उड्डाणासाठी सज्ज झाल्याचं दिसतंय.

विमानतळाची चार सदस्यीय डीजीसीए पथकाने तपासणी केलीय. राहिलेल्या त्रुटी येत्या आठ दिवसांत दूर करून विमानसेवा सुरू केली जाणार आहे.

विमानसेवेसाठी सोलापूरचं होटगी रोड विमानतळ सज्ज झालंय. डीजीसीएकडून लवकरच विमानसेवेसाठी ना-हरकत प्रमाणपत्र मिळणार आहे. त्यामुळे विमानसेवा देणाऱ्या कंपन्यांना सोलापुरात आणून विमानसेवा सुरू करावी, अशी विनंती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

**सोलापूर विमानतळ उड्डाणासाठी सज्ज**

आता आगामी विधानसभा निवडणुकीपूर्वीच सोलापूर विमानतळावरुन प्रवासी उड्डाण सुरु होणार असल्याचं दिसतंय. उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी जिल्हाधिकाऱ्यांनी याबाबत फोनवर चर्चा केली आहे. सोलापुरातील विमानतळाच्या तपासणीनंतर डीजीसीए पथक सकारात्मक आहे. दोन आठवड्यांत सोलापुरातील विमानसेवेसाठी परवाना मिळणार आहे.पथकातील चार सदस्यांनी विमानतळाची पाहणी केली आहे. तपासणीचा अहवाल जिल्हा प्रशासनाकडे सुपूर्द करण्यात आला आहे.

**विमानसेवा लवकरच सुरू होणार**

विमानतळ परिसराला लागून असलेल्या नागरी वसाहतीच्या खिडक्या विमानतळाच्या दिशेने होत्या. या खिडक्या बंद करण्याची सूचना सिव्हिल एव्हिगेशन टीमने केली. त्यानुसार जिल्हा प्रशासनाने खिडक्या बंद करायला लावल्या आहेत. अद्याप काही खिडक्या आहेत. त्या लवकर बंद होतील. विमानतळाला लागून असलेल्या मोकळ्या जागेत मोठे दगड आढळले. विमानतळ परिसरातून दगड काढून टाकण्याची सूचना पथकाने केलीय. त्यामुळे प्रशासन लवकरच यावर कार्यवाही करणार आहे.

सोलापुरमधील प्रवासी विमानसेवा सुरु करण्याच्या हेतुने जून २०२३ मध्ये चिमणी पाडण्यात आली होती. जानेवारी महिन्यामध्ये विमानतळ बंद होवून कामांना सुरुवात झाली होती. त्यानंतर पहिल्यांदाच सोलापूर विमानतळावर विमान उतरले होते. त्यामुळे आता सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात विमानसेवा सुरु होऊ शकतात, असं बोललं जातंय.




संपादकीय

# नव्या शैक्षणिक धोरणातील आव्हाने

नवीन शैक्षणिक धोरणाला 29 जुलै 2020 रोजी केंद्र सरकारने मान्यता दिली व ते 2023-2024 या शैक्षणिक वर्षात अस्तित्वात आले. या धोरणाचा उद्देश 2030 पर्यंत भारतीय शिक्षण व्यवस्थेत संपूर्ण परिवर्तन घडवून आणण्याचा असल्याने याला एक नवीन दिशा देणारे आणि 'गेमचेंजर' दस्तऐवज म्हणून संबोधले जाते. हे नवीन शैक्षणिक धोरण राबविताना, बरीच आव्हाने समोर येत आहेत.

**'मास्टर ऑफ नन'**

विद्यार्थ्यांना विस्तृत विषयांमध्ये एकाच वेळी अध्ययन करायला मिळणार असले तरी व्यावसायिक शिक्षण आणि कौशल्य विकासावर अधिक भर दिल्याने, कला आणि सामाजिक विज्ञान या विषयांवर कमी लक्ष दिले जाण्याची शंका येथे स्वाभाविकपणे उपस्थित होते. त्यामुळे असे संकुचित लक्ष विद्यार्थ्यांच्या एकूण बौद्धिक आणि सर्जनशील वाढीस अडथळा आणू शकते. एकाच वेळी विविध विद्याशाखेंच्या विषयांच्या अध्यायनामुळे विद्यार्थी, 'जॅक ऑफ ऑल आणि मास्टर ऑफ नन' होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**अभ्यासक्रमाचा दर्जा**

नवीन शैक्षणिक धोरणात प्रत्येक विद्यार्थ्यार्ला एक मेजर विषय, एक मायनर विषय, एक जेनरिक/ओपन इलेक्टिव्ह विषय, एक व्यवसाय व कौशल्य संबंधित विषय, क्षमता वृद्धिंगत अभ्यासक्रम, भारतीय ज्ञान प्रणाली आणि मूल्यशिक्षण अभ्यासक्रम इत्यादीमधून क्रेडिट्स (गुण) प्राप्त करावे लागणार आहे. त्याचबरोबर इंटर्नशिप/फील्ड प्रोजेक्ट/शिक्षणार्थी/सामुदायिक प्रतिबद्धता आणि प्रमुख विषयाशी संबंधित सेवा, सहअभ्यासक्रम आणि संशोधन प्रकल्प पण अभ्यासक्रमात समाविष्ट आहेत. एवढे सर्व अभ्यासक्रमात समाविष्ट असल्याने मेजर (मुख्य) विषयातील बराचसा आवश्यक भागच (विषय) अभ्यासक्रमात घेणे शक्य न झाल्याचे असे मत बहुतांशी शिक्षण तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. मेजर विषय हा महत्त्वाचा असूनही त्यातील महत्त्वाचे विषय/भाग मुलांच्या अभ्यासक्रमात न आल्याने अभ्यासक्रमाचा दर्जा घसरल्याचे त्यांनी सांगितले. तसेच विद्यार्थ्यांना एकाचवेळी एवढ्या विविध उपक्रमांतून क्रेडिट्स (गुण) मिळविणे कितपत सोयीस्कर पडेल किंवा झेपेल या प्रश्नाचे उत्तर काळच ठरवेल.

**गुणवत्तेवर विपरीत परिणाम**

नवीन शैक्षणिक धोरणात शिक्षकांच्या प्रशिक्षणावर जोर दिला गेला आहे. सतत व्यावसायिक विकास आणि प्रोत्साहनांसाठी स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वांचा अभाव, वर्गखोल्यांमध्ये दिल्या जार्णाया शिक्षणाच्या गुणवत्तेवर विपरित परिणाम करू शकतो. मोठ्या संख्येने असलेल्या शिक्षकांच्या दजेर्दार प्रशिक्षणाची व्यवस्था कमी पडू शकते.

**प्रादेक्षिक विविधतेकडे दुर्लक्ष**

देशभरातील शिक्षणाचे प्रमाणीकरण (स्टँडर्डायझेशन) करण्याच्या धोरणाचे उद्दिष्ट प्रादेशिक आणि सांस्कृतिक विविधतेकडे दुर्लक्ष करू शकते. सर्वसामान्य एकच दृष्टिकोन, कदाचित भिन्न राज्ये आणि प्रदेशांतील विद्यार्थ्यांच्या अद्वितीय गरजा आणि आकांक्षा पूर्ण करू शकणार नाही, अशी शंका उपस्थित होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**व्यावसायिक शिक्षण मातृभाषेतून**

शिक्षण प्रक्रियेत कोणतीही संकल्पना मातृभाषेतील समजावून घेणे सुलभ असते व त्यामुळे विद्यार्थ्यांचा आकलनाचा प्रवास सुलभ आणि समृद्ध होतो. त्यामुळे नवीन शैक्षणिक धोरणात गैर व्यावसायिक शिक्षण व व्यावसायिक शिक्षण हे मातृभाषेतून देण्याचा मानस आहे. यात प्रामुख्याने व्यावसायिक शिक्षण, जसे आरोग्य विज्ञान, अभियांत्रिकी, व्यवस्थापन शाखा इत्यादी मातृभाषेत घेर्णायांची पंचाईत होऊ शकते. आजपर्यंत व्यावसायिक शिक्षण जे इंग्रजी भाषेत शिकवले जाते, ते आता देशातील विविध प्रांतात, त्या त्या मातृभाषेत देण्याचा मानस आहे. विविध व्यावसायिक शाखेतील विषयांचे पुस्तके, अभ्यास साहित्य व संदर्भ ग्रंथ हे इंग्रजीत मुबलक उपलब्ध आहेत. त्यांचे विविध मातृभाषेत भाषांतर करणे हे अवघड काम आहे. कारण विविध विषयांची शब्दावली (टर्मिनॉलॉजी) ही विविध मातृभाषेत सापडणे कठीण जाऊ शकते. तसेच एखाद्या बहुराष्ट्रीय कंपनीत मराठी, पंजाबी, तामिळ, गुजराती व बंगाली इत्यादी भाषांतून शिकलेल्या इंजिनियर्सनी एकत्रित काम करणे किंवा त्यांच्यामध्ये समन्वय होणेही कठीण जाऊ शकते. कारण त्यांनी त्यांचे अभियांत्रिकी शाखेचे शिक्षण आपापल्या मातृभाषेतून घेतलेले असेल. तसेच मातृभाषेतून व्यावसायिक शिक्षण घेर्णाया विद्यार्थ्यार्ला परदेशात कितपत संधी मिळेल हीसुद्धा शंका आहे. त्यामुळे काही शिक्षण तज्ज्ञांच्या मते, बारावीपर्यंत शिक्षण मातृभाषेत मिळावे, परंतु नंतर व्यावसायिक शिक्षण हे इंग्रजीतूनच असावे.

**अर्धवट शिक्षण**

पदवीचा कालावधी तीन वर्षांवरून चार वर्षापर्यंत वाढवला आहे. जरी एक वषार्नंतर सर्टिफिकेट, दोन वषार्नंतर डिप्लोमा देणार आहे, तरी तीन ऐवजी चार वर्षाचा पदवी अभ्यासक्रम काही विद्यार्थी अर्धवट सोडण्याचा धोका आहे.

**मूल्यांकन करणे अशक्य**

विद्यार्थी हा शैक्षणिक प्रक्रियेचा केंद्रबिंदू आहे. नवीन शैक्षणिक धोरणात विद्यार्थांच्या प्रगतीचे सतत मूल्यांकन करण्यावर भर दिला आहे. निश्चितपणेच मूल्यमापन हा अध्ययन-अध्यापन पद्धतीचा एक भाग असून अध्ययनाच्या विविध टप्प्यांवर मूल्यमापन व्हावे आणि अध्यापकांद्वारे विद्यार्थ्यांची प्रगती पडताळावी, हे अपेक्षित आहे. उच्च शिक्षणावरील अखिल भारतीय सर्वेक्षणानुसार (2021-2022) भारतात उच्च शिक्षणात 4.33 कोटी विद्यार्थांची नोंदणी झाली आहे. एवढ्या मोठ्या संख्येने विद्यार्थी उच्च शिक्षणात असल्याने, प्रत्येक वर्गात 100च्या वर विद्यार्थी असतात. भारतात एवढ्या मोठ्या प्रमाणावर असणारी विद्यार्थी संख्या व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचार्यांची रिक्त पदे, त्यामुळे विद्यार्थ्यांचे सतत मूल्यांकन करणे कितपत व्यावहारिक व शक्य आहे, हे तपासणे जरुरीचे आहे.

**अभ्यासक्रम वेळेत पूर्ण होणे कठीण**

उच्च शिक्षणात आता टू सेमिस्टर पद्धती सूरू झाली आहे. त्यामुळे महाविद्यालयात वषार्तील जवळपास सहा महिनात परीक्षा सुरू असतात. प्रत्येक शैक्षणिक सत्रात, अभ्यासक्रम पूर्ण होणे कठीण होत आहे. विद्यार्थांचे अध्यापन घाईघाईतच होत आहे. त्याचबरोबर विद्यार्थांना अभ्यासेतर क्रियाकलापांमध्ये भाग घेणे अवघड जात आहे. त्यामुळे सेमिस्टर पद्धतीबाबत पुनर्विचार होणे आवश्यक ठरते.

**विद्यापीठांना धोका**

नवीन शैक्षणिक धोरणात विदेशी विद्यापीठे व संस्थांना भारतात कॅम्पस, केंद्रे स्थापन करण्याची परवानगी मिळणार असून हे धोरण आंतरराष्ट्रीय सहकार्याला चालना देणारे आहे. विद्यार्थ्यांसाठी जास्तीत जास्त आंतरराष्ट्रीय एक्सपोजर हा यामागचा उद्देश. विदेशी विद्यापीठांचा दर्जा व त्यांच्याकडे असर्णाया मुबलक निधीमुळे आपले विद्यार्थी तेथे आकर्षित होण्याची शक्यता आहे व त्यामुळे आपल्या सार्वजनिक विद्यापीठांच्या अस्तित्वाला धोका निर्माण होऊ शकतो. परदेशी विद्यापीठांच्या कॅम्पसमधील शैक्षणिक शुल्क भारतातील किती विद्यार्थ्यांना परवडणारे असेल? दजेर्दार शिक्षण फक्त श्रीमंतांसाठी अशी व्यवस्था निर्माण होऊन शैक्षणिक दरी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# गणेश विसर्जन करतांना सर्वांनीच सावधगिरी बाळगावी व प्रशासनाच्या नियमांचे पालन करावे

जी सध्याच्या परिस्थितीत महाराष्ट्रातील अनेक भागात अचानक अतिवृष्टीमुळे अनेक भाग जलमग्न झालेला आहे.यामुळे काही भागातील नदी-नाले,तलाव,विहिरी व समुद्र किनारा या सर्व तुडुंब भरलेल्या आहेत. गणपती स्थापनेच्या दिड दिवसांपासून गणपती बाप्पाच्या विसर्जनाला सुरूवात झालेली आहे.त्यामुळे बाप्पाचे विसर्जन करतांना सर्वांनीच सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे.कारण गणपती विसर्जन करतांना नदी, तलाव, विहीर, समुद्र किनारा याठिकाणी कळत-नकळत दुर्घटना होऊ शकते याला नाकारता येत नाही आणि अशा प्रकारच्या यापूर्वी अनेक दुर्घटना झालेल्या आहेत ही बाब सर्वांनाच ग्यात आहे. त्यामुळे गणेश विसर्जन सावधगिरीने करावे.त्याचप्रमाणे लहान मुलांना विसर्जन स्थळापासुन दुरच ठेवावे. कारण छोटीशी चुक परिवारावर मोठा आघात करू शकते.कारण खेड्यापाड्यात, शहरात बाप्पाच्या विसर्जनाच्या वेळी भक्तगण विसर्जनाच्या ठिकाणी जातात. अशा परिस्थितीत कोणताही धोका ओढावून नये याची काळजी सर्वांनीच घेतली पाहिजे. गणेश विसर्जनासाठी तलावांवर बंदी आहेच.परंतु प्रशासनाने जे गणेश विसर्जनाचे ठिकाण (स्थळ) दिले आहे किंवा प्रशासनाने बनवीलेल्या कृत्रिम तलाव यामध्ये विसर्जन करायला हवे. यदाकदाचित एखादी अकस्मात घटना घडली तर प्रशासन आपल्या मदतीला धावून येवु शकते.त्यामुळे प्रशासनाचे नियम पाळुन सवार्नी गणेश विसर्जनाचा आनंद घ्यावा व सावधगिरी बाळगवी.कारण आपण अनेकदा पाहिले व ऐकले सुध्दा आहे की मुर्ति विसर्जनाच्या वेळेस जिवीत हानी व दुर्घटना सुध्दा झालेल्या आहेत. या संपूर्ण गोष्टी डोळ्यासमोर ठेवून व सतर्कता बाळगुन गणेश विसर्जन केले पाहिजे.त्याचप्रमाणे सरकारने व प्रशासनाने घालून दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करणे गरजेचे आहे.ज्या-ज्या ठीकाणी कृत्रीम तलाव (आटीर्फीशीयल टँक)ची व्यवस्था केलेली आहे, त्या-त्या ठिकाणी त्याचा उपयोग सर्वांनीच केला पाहिजे. परंतु ज्या ठिकाणी कृत्रिम तलावांची व्यवस्था नाही असे भक्तगण नदी, विहीर, समुद्र किनारा, किंवा तलावामध्ये गणरायाचे विसर्जन करतात त्या-त्या ठिकाणी सर्वांनीच विसर्जन करतांना काटेकोरपने सावधगिरी बाळगणे अत्यंत गरजेचे आहे.मुख्यत्वेकरून मंडळांचे मोठे गणपती असतात. अशा परिस्थितीत मंडळाच्या भक्तांनी गणपती विसर्जन करतांना सतर्कता बाळगून व प्रशासनाच्या नियमांचे पालन करून विसर्जन करावे.कारण छोटीशी चुक मोठा आघात पोहचवु शकते याला नाकारता येत नाही आणि याचे दुःख संपूर्ण परिवाराला व मंडळाला भोगावे लागते.गणेश विसर्जनाच्या निमित्ताने हेच सांगु इच्छितो की बाप्पांना निरोप देतांना गणेश विसर्जनाची प्रक्रीया सांभाळून करावी. त्याचप्रमाणे "निर्माल्य" तलाव, विहीर, नदी, समुद्र किनारा यामध्ये न टाकता प्रशासनाने निर्माल्याची व्यवस्था ज्या ठिकाणी केली आहे त्याठिकाणीच टाकावे.यामुळे प्रदूषणावर आवर घातला येईल व पाणी दुषित होण्यापासुन वाचेल. सोबतच जलचर प्राण्यांचे प्राणसुध्दा वाचेल.अशाप्रकारे संपूर्ण गणेश भक्तांनी काळजी घेणे आवश्यक आहे.गणपती बाप्पा आपल्या घरी दरवर्षी येणार. कारण गणेश विसर्जन करतांना गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या! असा जयघोष करून बाप्पाणा आपण निरोप देवून विसर्जन करतो.परंतु गणेश विसर्जनाच्या निमित्ताने गणेश भक्तांनी आपल्या परिसरात एकतरी वृक्ष लावुन गणरायाला निरोप द्यावा. यामुळे गुरांना चारा,सर्वांना शुद्ध हवा व ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल.कारण आज कोणत्या ना कोणत्या पद्धतीने वृक्ष लागवड करणे काळाची गरज आहे."गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या" जय श्री गणेश!



**रमेश कृष्णराव लांजेवार**
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# सुशिलकुमार शिंदेचा अकलूजला होणार भव्य नागरी सत्कार

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** जेष्ठ नेते विजयसिंह मोहिते-पाटील यांचे सहकारी, राज्याचे माजी गृहमंत्री सुशिलकुमार शिंदे यांच्या ८४ व्या वाढदिवसाचे औचित्य साधुन, माळशिरस तालुक्याच्या वतीने अकलूज येथील क्रीडा संकुलावर भव्य नागरी सत्काराचे आयोजन केले असल्याची माहिती; शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विद्यमान खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी पत्रकारांना दिली.

खा. धैर्यशील मोहिते-पाटील म्हणाले, विजयदादा आणि सुशिलकुमार शिंदे हे महाराष्ट्र राज्यातील जेष्ठ नेते आहेत. त्यांनी खुप वर्ष एकमेकांसोबत राज्याचे राजकारण केले आहे. अशा जेष्ठ आणि दिग्गज नेत्याचा माळशिरस तालुक्याच्या वतीने भव्य नागरी सत्कार करण्याचे योजले आहे. हा सत्कार माळशिरस तालुक्याच्या वतीने असल्याने यात कोणीही राजकारण आणु नये. या सत्कार समारंभाच्यावेळी राष्ट्रवादी पक्षाचे प्रमुख शरद पवार यांच्यासह राज्यातील बरीच दिग्गज मंडळी उपस्थित राहणार आहेत.

यावेळी झालेल्या बैठकीत सत्कार समारंभाचे नियोजन करण्यासाठी कार्यकर्त्यांना कामे वाटुन देण्यात आली. यावेळी भाजपाचे आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील उपस्थित असल्याने अनेकांनी आश्चर्य व्यक्त केले. त्यावर बोलताना आ. रणजितदादा म्हणाले, मी तालुक्याचा नागरीक या नात्याने सत्कार समारंभाला उपस्थित राहणार आहे. त्यामुळे कोणी इतर काही मनात आणु नये. संयोजकांनी परवानगी दिल्यास मी भाषणही करेन.



विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर मोहिते-पाटील यांनी आयोजलेल्या या भव्य कार्यक्रमामुळे सोलापूर जिल्ह्याचे राजकारण ढवळून निघणार आहे. सध्या सोलापूर जिल्ह्यातील अनेक विधानसभा मतदार संघातून अनेक नेते तुतारी फुंकण्याच्या तयारीत आहेत. माढा, पंढरपूर, सोलापूर, मोहोळ सारख्या राजकिय संवेदनशिल भागातून वेगळी समिकरणे तयार होण्याची चिन्हे दिसत आहेत. जिल्ह्याच्या प्रत्येक मतदार संघातील नेते मंडळी शरद पवार व मोहिते पाटील यांच्या सातत्याने संपर्कात असल्याने, भाजपाच्या गोटात खळबळ उडाली आहे. या कार्यक्रमाच्या निमित्ताने संपुर्ण राज्यातून नेते मंडळी एकत्र येतील. त्यांच्या भाषणांनी सोलापूर जिल्ह्यात तुतारी बळकट होईल या धास्तीने विरोधकांची झोप उडाली आहे.

यावेळी आ. रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी महावितरण व सार्वजनिक बांधकाम विभागांकडील मंजुर कामांचा धावता आढावा घेतला. माळशिरस तालुक्यात वीजेच्या समस्या दुर करण्यासाठी सुमारे ३२८ कोटी रूपयांचा निधी खर्च करणार आहोत. तालुक्यासाठी ४०० नविन रोहित्र बसवण्यात येतील. ३३/११ थे ५ सबस्टेशन, नविन वाढीव क्षमतेची उपकेंद्रे, अकलूज हे मेडिकल हब असल्याने येथे २४ तास वीज पुरवठा होण्यासाठी ३३ के. व्हीची नविन वाहिनी टाकणार, २७० कि.मी.ची ११ के. व्हीची लाईन, १७३ कि.मी.च्या लघुदाब वाहीन्या वाढवणार आहोत. त्याचबरोबर सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तालुक्यातील रस्ते दुरुस्तीसाठीची सुमारे २७८ कामे मंजुर आहेत. त्यापैकी ६४ कामे सध्या सुरू आहेत. सदाशिवनगर येथील शेती महामंडळाकडील सुमारे २२० एकर जागेवर एमआयडीसी होण्यासाठी सध्या शेती महामंडळ, एमआयडीसी यांच्याकडून पाहणी झालीय. त्याचा अहवाल शासनाकडे गेला आहे. माझी उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याशी बैठक झाली असल्याची माहिती आ. रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी दिली.

यावेळी अर्जुनसिंह मोहिते-पाटील, शिवतेजसिंह मोहिते-पाटील, विश्वतेजसिंह मोहिते-पाटील, मामासाहेब पांढरे, ॲड. प्रकाश पाटील, दत्तात्रय भिलारे, मिलींद कुलकर्णी व माळशिरस तालुक्यातून आलेले कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राज्य शासनाच्या शिष्टमंडळाने घेतली सकल धनगर समाजाच्या उपोषणकर्त्यांची भेट

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** धनगर समाजाचा एसटी प्रवर्गामध्ये समावेश करावा या मागणीसाठी गेली सहा दिवसांपासून सकल धनगर समाजाच्या प्रतिनिधींचे टिळक स्मारक, पंढरपूर येथे आमरण उपोषण सुरू आहे. पंढरपूर येथे सुरू असलेल्या उपोषणावर तोडगा काढण्यासाठी राज्य शासनाच्या शिष्टमंडळाने भेट घेतली. राज्य शासनाच्या शिष्टमंडळातून उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्य मंत्री तथा पालकमंत्री चंद्रकांत पाटील, राज्य



उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांनी उपोषण स्थळी भेट देऊन उपोषणकर्त्यांशी चर्चा करून तब्येतीची विचारपूस केली.

यावेळी सकल धनगर समाजाच्या मागण्याबाबत उद्या दिनांक 15 सप्टेंबर 2024 रोजी सह्याद्री अतिथीगृहावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सकल धनगर समाजाच्या प्रतिनिधी सोबत बैठक घेणार असल्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील व राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांनी यावेळी सांगितले.

प्रबोधन

# सज्जनांनो उठा । देशाला वाचवा

चांगल्या देशाची व्याख्या करताना स्वामी विवेकानंद म्हणालेत, 'ज्या देशातील माणसं चांगली असतात, तो देश चांगला आणि महान असतो!' मग भारतात चांगली माणसं राहातात की नाही? यावर ते पुढे म्हणतात, 'भारतात जातिभेद मानणारे लोक राहातात. ते उच्च-नीचता मानतात, उच्च जातीचे लोक इतर जातींवर जुलूम करतात. अशा परिस्थितीत भारत देशाला चांगला देश म्हणणं कठीण आहे.' भारतातील शिक्षण प्रसारही स्वामीजींच्या अवलोकनात आला होता. पण शिक्षित माणसांचं वर्तनही त्यांना चुकीचं वाटत होतं. म्हणूनच ते म्हणतात, 'शिक्षित स्वमतांध लोक काम न करताच आपली सर्व शक्ती वाया घालवतात. हे अजाण, निर्बुद्ध लोक तऱ्हेतऱ्हेचे सिद्धान्त रचून आपल्या कल्पनांना पोषक अशी स्पष्टीकरणं देतात. थोरांच्या उपदेशाचा आपल्या मतानुसार अर्थ लावतात. त्यामुळे मूळ उद्देशाचा विपर्यास होतो.' या प्रकारालाच मतमतांचा गलबला। कोणी पुसेना कोणाला असं रामदास स्वामींनी म्हटलंय. मानसशास्त्राचे अभ्यासक Mental Set (मनोधारणा) हा शब्द विशिष्ट अर्थाने वापरतात. शिक्षणाने Mental Set ही साधला पाहिजे, आणि Law of readiness (तत्परतेची तयारी) सुद्धा साधला पाहिजे. पण प्राचार्य पी.बी.पाटील म्हणतात, 'दैववाद, उच्च-नीचता, परलोकवाद ही विचारसरणी वैचारिकता आणि कार्यक्षमतेची प्रचंड हानी करणारी असून तिने जनजीवन लुळंपांगळं केलं आहे.' त्यामुळे भारतीय माणूस शिकला काय आणि अडाणी राहिला काय सगळं सारखंच! अशा लोकांचा देश चांगला कसा असणार?' प्राचार्य शिवाजीराव भोसले तर घोर निराशेने म्हणतात, 'आपण समाजासाठी काय करावं आणि समाजाकडून काय घ्यावं, हे लोकांना न कळणं, ही अराजकाची प्रस्तावना आहे. भारत या अराजकाच्या काठावर उभा आहे. भारतात माणसं आहेत, पण समाज नाही. भूमी आहे पण राष्ट्र नाही. धर्मवेड आहे पण आचारधर्म नाही. लोक आहेत, पण त्यांना लोकशाही कळली नाही.' भारतात चार्वाकासारखा जीवनवादी जन्मला, बुद्धांसारखा अहिंसावादी निर्माण झाला, छत्रपती शिवरायांसारखा नीतिमान शूर स्वराज्यनिमार्ता, महात्मा गांधींसारखा असाधारण राजकारणी, महात्मा फुलेंसारखा सत्यशोधक, छत्रपती शाहूंसारखा समतावादी, डॉ.आंबेडकरांसारखा क्रांतदर्शी अशी नररत्न या भूमीत पैदा झाली; पण विचारवंतांच्या मतानुसार 'या देशातील माणूसपण या नावाची यंत्रणा निर्दोष होऊ शकली नाही. त्यामुळे समाजाला अहिंसा, प्रेम, परोपकारिता यांची चव चाखता येत नाही. समाजाच्या अनुभव यंत्रणेचं अंतरंग सुधारण्याचा प्रयत्न थोरांनी केला, पण त्या महात्म्यांना यश आलं नाही.' कारण भारतात तत्त्वप्रेरित व संस्थात्मक अशा जीवनाचा घोर अभाव आहे. जीवनाच्या विविध क्षेत्रात नैपुण्याचे निकष स्वीकारून, नीतिमूल्यांना प्राधान्य देऊन कर्माचरण करणं आवश्यक असताना तसं घडलं नाही. त्यामुळे चीन, जपान, जर्मनी, अमेरिका यांनी स्वीकारलेली सामुदायिक नीतिमत्ता आपल्या देशात अजून उदयास आलेली नाही.

म्हणूनच भारतात मंदिर - मशीदवादाची रथयात्रा असो वा आरक्षणाचा मोर्चा असो, गणेशोत्सव असो वा कोणा नेत्याचं शक्तिप्रदर्शन असो, सामाजिक निदर्शनं असोत वा सत्संग, प्रवचन असो; बेकारीमुळे गदीर्ची कमतरता कधीच भासत नाही. अण्णा हजारेंना काय हवं, हे ज्यांना माहीत नव्हतं, अशी हजारो माणसं त्यांच्या जनलोकपाल विधेयकाच्या आग्रही मोहिमेत गर्दी करून जोतिबाच्या जत्रेला गेल्यासारखी चार-पाच वर्षांच्या आपल्या लेकरांना खांद्यावर बसवून वावरताना आपण नुकतीच पाहिली. कॉलेज-शाळेतील युवक- युवती हुंदडण्याच्या हेतूने तेथे ठाण मांडून जयघोषाचं निमित्त करून आरडाओरडा करण्याची हौस (?) भागवून घेत होती. त्यातूनही धार्मिक कारणांसाठी जमणारी गर्दी अत्युच्च पातळी गाठते. ऐतिहासिक कारणासाठी त्या खालोखाल गर्दी असते. कोण्या टग्या नेत्याने जरा कुठे भावनेला आवाहन केलं की, तुडूंब गर्दी करायची, हे आपल्या जनतेचं खास लक्षण आहे. प्राचार्य शिवाजीराव भोसले म्हणतात, 'बेकारांच्या समाजकारणाने आदशार्चं विकृतीकरण, सैतानाचं धर्मकारण, अंधश्रद्धांचं दृढीकरण, तत्त्वहीन राजकारणाचं सबलीकरण गर्दीकडूनच होत असतं.' या गदीर्ला विचारहीन भावनिकतेने पछाडलेलं असतं.

मानसशास्त्रज्ञ गर्दीचं मानसशास्त्र विचारात घेतात, गर्दी कोठेही जमली की ती अंध आणि आवेशयुक्त असते, असे निष्कर्ष मानसशास्त्र काढते. भारतात शहरी आणि ग्रामीण भागात लाखो लोक बेकार, फुकटखाऊ आहेत. ते कोणत्याही चळवळीला संख्याबळ पुरवतात म्हणून भारत देश विचारवंतांना भ्रमिष्ट करणारा वाटतो. भारतीय मानसशास्त्रज्ञांना आधी बेकारांचं मानसशास्त्र समजून घ्यावं लागेल. म्हणूनच प्राचार्य शिवाजीराव भोसले म्हणतात, 'भारताची प्रकृती आणि संस्कृती ठरवणं हे सोपं काम नाही. त्यासाठी खास संशोधन करावं लागेल. भारतात भारतीयत्व नावाच्या जीवनसत्वाची मात्र कमतरता आहे.' सुज्ञ, समतोल विचारवंतच ही कमतरता दूर करू शकतील, त्याशिवाय हा देश महान होणार नाही. कारण-

भारत हा आहे । चक्रव्यूह मोठा
घातपाता तोटा । नाही येथे ॥१
अभिमन्यू किती । मारले व्यूहाने
भ्रमाने मेंदू । फस्त केले ॥२
आंधळ्यांना मार्ग । धूर्त दावितसे
भोळ्यांना नेतसे । बळी देण्या ॥ ३
भावनांचा क्षोभ । टगे घडविती
पोळी भाजताती । होळीवर ॥४
कुणीही उठतो । गर्दी जमविती
क्षणार्धात होतो । मोठा हीरो ॥५
मेंढरांचा देश । खड्डयाकडे निघे
अंध एकामागे । एक जाई ॥ ६
सज्जनांनो उठा । देशाला वाचवा
किनाऱ्याला लावा । देशनौका ॥७



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**

# पंढरपूरसाठी १३ एम एल डी क्षमतेच्या मलनिस्सारण प्रकल्पास मान्यता - आ. समाधान आवताडे

## १२२ कोटींचा प्रकल्प : ११० कोटींचे अनुदान : ७ दिवसात निविदा ९१ दिवसात काम सुरु होणार

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर शहरासाठी १३ एम एल डी क्षमतेच्या मलनिस्सारण प्रकल्पास राज्य शासनाने गुरुवार (दि. १२) रोजी मंजुरी दिली असून १२२ कोटी रुपयांच्या या प्रकल्पामध्ये १०९. ९० कोटी रुपये शासनाचे अनुदान असेल तर २२ कोटी रुपये पंढरपूर नगरपरिषदेचा हिस्सा असणार आहे. येत्या ७ दिवसात या कामाची निविदा निघणार असून ३ महिन्यात काम सुरु होईल, दोन वर्षात काम पूर्ण होणार आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर पंढरपूर शहरातील सांडपाणी आणि मैला मिश्रित पाणी चंद्रभागेला येण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटणार आहे, अशी माहिती आ. समाधान आवताडे यांनी दिली आहे.

गुरुवारी राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने या प्रकल्पास प्रशासकीय मान्यतेचा अध्यादेश काढला आहे. यासंदर्भात अधिक माहिती देताना आ. समाधान आवताडे पुढे म्हणाले कि, पंढरपूर शहराची सध्याची मलनिःसारण यंत्रणा अपुरी ठरत असल्याने शहरातील सांडपाणी आणि मैलामिश्रित पाणी चंद्रभागा नदीत मिसळते आहे. याशिवाय उपनगरी भागातील सांडपाणी यमाई तलावात मिसळून हा तलाव प्रदूषित होत आहे.त्यामुळे वाढीव क्षमतेच्या मलनिःस्सारण प्राकल्पाची गरज होती. शिवाय शहराच्या चार भागातून सांडपाणी पंपिग करण्याची गरज होती. त्यामुळे या सर्वच कामासाठी राज्य शासनाने नगरोत्थान



महाभियानांतर्गत प्रशासकीय मान्यता दिली होती. गुरुवारी मंजुरीचा आदेश निघाला आहे.

एकूण १३ एम एल डी पाण्यावर प्रक्रिया करण्याची क्षमता या प्रकल्पाची आहे. यामध्ये इसबावी हद्दीत अक्षत बंगलोज, अहिल्या पूल, यमाई तलाव आणि लेंडकी नाला (गोपाळपूर) या चार ठिकाणी १३ एम एल डी क्षमतेचे पंपिग स्टेशन असतील. तर गोपाळपूर हद्दीत मलनिःस्सारण केंद्राजवळ होणार आहे. यामध्ये शहरातील ३ हजार ७५६ मालमत्ता या नवीन योजनेस जोडलय जातील आणि दररोज १३ एम एलडी सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाईल. येत्या ९ दिवसात या कामाची निविदा निघणार असून ४ वर्षात काम पूर्ण होणार आहे. या प्रकल्पासाठी राज्य शासन १०९. ९० कोटी रुपये अनुदान देणार असून पंढरपूर नगरपालिकेस केवळ १० टक्के म्हणजे १२. २१ कोटी इतका निधी द्यावा लागणार आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर चंद्रभागा, यमाई तलावाचे प्रदूषण पूर्णपणे बंद होणार आहे, अशीही माहिती आ. अवताडे यांनी दिली.

मागील अनेक वर्षापासून शहर आणि उपनगरी भागातील सांडपाणी आणि मैला मिश्रित पाण्याचा प्रश्न गंभीर झालेला होता. चंद्रभागा नदी, यमाई तलावाचे प्रदूषण वाढले होते. त्यामुळे या मलनिस्सारण प्रकल्पासाठी राज्य शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला आहे. विधानसभेत या प्रश्नांवर लक्षवेधी मांडलेली होती. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे पाठपुरावा केला आणि हा प्रकल्प अखेर मंजूर झाला. याबाबद्दल राज्य शासन आणि मुख्यमंत्री, दोनही उपमुख्यमंत्री यांना धन्यवाद

**- आ. समाधान आवताडे**

वात्रटिका

### बळं दाखवी बळ

कोणाचे तरी कोणाशी
म्हणे जुळलेले सुत आहे...
उकरून काढून पुन्हा त्या
शिळ्या कडीला उत आहे...
विषय कोठे पोहचला आहे
आणि काय बोलले जाते...
टिरी बडवून नसलेल्या
गोष्टींचे पोल खोलले जाते...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना वचनपूर्ती सोहळा पूर्वतयारीचा निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांच्याकडून आढावा

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** मुख्यमंत्री महिला सशक्तिकरण अभियानांतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा वचनपूर्ती सोहळा कार्यक्रम माहे सप्टेंबर 2024 मध्ये नियोजित आहे. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने जिल्ह्यातील सर्व शासकीय यंत्रणांना जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांनी प्रत्येक शासकीय यंत्रणेने हा सोहळा यशस्वी होण्यासाठी केलेल्या पूर्वतयारीचा आढावा घेऊन मार्गदर्शक सूचना दिल्या.



नियोजन भवन येथे आयोजित मुख्यमंत्री महिला सशक्तिकरण अभियानांतर्गत पूर्वतयारी आढावा बैठकीत निवासी उपजिल्हाधिकारी कुंभार बोलत होत्या. उपजिल्हाधिकारी तथा भूसंपादन अधिकारी संतोष देशमुख, जिल्हा कार्यक्रमाधिकारी प्रसाद मिरकले, सोलापूर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदिप कारंजे, जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, विशेष व गुन्हे पोलीस उपआयुक्त श्रीमती दिपाली काळे, सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता श्रीनिवास गुजरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता एम.आर.ठाकरे, तहसिलदार श्रीकांत पाटील यांच्यासह अन्य सर्व संबंधित विभागाचे प्रमुख उपस्थित होते. तसेच सर्व उपविभागीय अधिकारी व तहसीलदार ऑनलाईन द्वारे बैठकीत सहभागी झालेले होते.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी कुंभार यांनी बैठकीत बांधकाम विभागाकडून कार्यक्रम स्थळावर करण्यात आलेल्या नियोजनाची माहिती जाणून घेतली. तसेच पार्कीग, वीज पाणी, साफसफाई याबाबतची महापालिकेकडून माहिती घेतली व आवश्यक सूचना दिल्या. सर्व विभागांनी सोपविलेली कामे वेळेत पूर्ण करावीत. कार्यक्रम स्थळी शासकीय विभागांनी समन्वय ठेवून नियोजनबध्द काम करावे.

पोलीस विभागाने कार्यक्रमाच्या दिवशी वाहतूक व्यवस्थेचे नियोजन काटेकोरपणे करावे. वाहतुकीस कोठेही अडथळा निर्माण होणार नाही या अनुषंगाने पार्किंगची व्यवस्था ठेवावी. एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी महिला लाभार्थी घेऊन येणे व मेळावा झाल्यानंतर त्यांच्या ठिकाणी सोडणे यासाठी आवश्यक असलेल्या बसेसची पूर्तता करावी. पुरवठा विभागाने लाभार्थ्यांसाठी जेवणाची उत्कृष्ट व्यवस्था करण्याबरोबरच त्यांना कोणतीही अडचण येणार नाही याची ही दक्षता घ्यावी, असे त्यांनी सुचित केले.

# तांत्रिक तज्ञ कर्मचाऱ्यांचा विविध मागण्यासाठी बेमुदत काम बंद आंदोलन
## ६ दिवस काम बंद असून प्रशासनाने दखल घेतली नाही

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** शहरस्तरीय तांत्रिक तज्ज्ञ कर्मचारी संघटनेच्या मूलभूत प्रश्न व मागण्यांवर दुर्लक्ष होत असून राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) या योजनेची अंमलबजावणी शहरस्तरीय तांत्रिक कक्षामार्फत २०१८ पासून करण्यात येत आहे. सदर कर्मचारी यांच्यामार्फत विविध मागण्या शासनापुढे मांडण्यात आल्या होत्या. यावर अद्यापही शासनाने लक्ष दिले नसल्याने संघटनेकडून बेमुदत संप करण्यात आला असून सदर मागण्याचे निवेदन जिल्हा प्रशासन अधिकारी वीणा पवार यांना दिले होते. निवेदन देऊन सहा दिवस गेले कर्मचारी ६ दिवस संपावर



असून देखील अद्याप शासनाने कोणत्याही प्रकारची दाखल घेतलेली नाही.

शहरस्तरीय तांत्रिक कक्षातील कर्मचाऱ्यांना शासन सेवेमध्ये सामावून घ्यावे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार डिसेंबर २०२४ अखेरीस योजना संपुष्टात आल्यानंतर व प्रधानमंत्री आवास योजना भाग-२ ची अंमलबजावणी सुरु होणार असून ज्या नगरपालिकेचे नवीन प्रकल्प नसतील अथवा जुने प्रस्ताव पूर्ण झाले असतील तेथील कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त न करता त्यांना केंद्र, राज्य शासनाचा इतर योजनामध्ये सामावून घेऊन वयाच्या ५८ वर्षापर्यंत काम करण्याची संधी मि ळावी या बाबत हमी देण्यात यावी. शहरस्तरीय तांत्रिक तज्ज्ञ कक्षातील सर्व महिला कर्मचारी यांना प्रसूती रजा लागू करावी.

सदरील कर्मचाऱ्यांना अंशकालीन कर्मचारी म्हणून ग्राह्य धरून भरतीमध्ये राखीव आरक्षण ठेवण्याची मागणी आहे. शहरस्तरीय तांत्रिक कक्षातील कर्मचाऱ्यांना मागील ६ वर्षांपासून वेतनवाढ दिलेली नाही. सदर कर्मचारी हे ६-७ वषार्पासून या योजनेमध्ये काम करूनदेखील कोणत्याही प्रकारचे मनुष्यबळ धोरण लागू करण्यात आलेले नाही. यासाठी शासनाकडे वारंवार पाठपुरावा करून देखील कोणत्याही प्रकारची मनुष्यबळ धोरणाची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही.

याप्रसंगी राज्यध्यक्ष विशाल बेडगे, जिल्हाध्यक्ष अमित कोरे, उपाध्यक्ष योगेश डोके, तेजस सुर्यवंशी, संकल्प शहाणे, निखिल शिंदे, सिद्धांत हरवळकर, दयानंद हांगर्गी, प्रथमेश अल्लोली सीएलटीसी तज्ज्ञ उपस्थित होते.

# पेट्रोल-डिझेल-एलपीजीच्या वाढत्या किमती, वाढती महागाई, बेरोजगारी आणि भ्रष्टाचार यांच्या विरोधात 'खर्चे पे चर्चा' मोहिमेची सुरुवात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महागाई गगनाला भिडल्याने सर्वसामान्य कुटुंबांचे आर्थिक गणित बिघडले आहे. पेट्रोल, डिझेल, गॅस, भाज्या, धान्य सर्वांच्याच किंमती प्रचंड वाढल्या आहेत, घर चालवणे गृहिणींना कठीण झाले आहे.

निवडणुकीच्या तोंडावर महागाई कमी करण्याचे आश्वासन देऊन भाजपा महिलांची फसवणूक करते. महागाईमुळे सण, उत्सावाचा रंग फिका पडला आहे. या महागाईने जनता त्रस्त



आहे म्हणून भाजपा सरकारला जाग आणण्यासाठी महिला काँग्रेसने राज्यभरात 'खर्चे पे चर्चा' अभियान राबवणार आहे, अशी माहिती महिला काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा अलका लांबा, महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेसचे अध्यक्ष संध्याताई सव्वालाखे यांनी शुक्रवारी दि. ०६ सप्टेंबर २०२५ रोजी टिळक भवन येथे झालेल्या पत्रकार परिषदेत अलका लांबा यांनी या मोहिमेची घोषणा केली होती त्या अनुषंगाने आज माजी केंद्रीय गृहमंत्री मा. सुशीलकुमार शिंदे साहेब व खासदार प्रणितीताई शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला अध्यक्ष प्रमिलाताई तुपलवंडे यांच्या नेतृत्वाखाली सोलापूरचे प्रभारी महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेसचे महासचिव शीलाताई उंबरे पेंढारकर व प्रदेश काँग्रेस सचिव अलकाताई राठोड यांच्या प्रमुख उपस्थितीत खर्चे पे चर्चा मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला यावेळी शीला उंबरे पेंढारकर म्हणाले की महागाई प्रश्नी भाजपा सरकारला जाग आणण्यासाठी दिनांक १४ सप्टेंबर २०१४ पासून सोलापूर शहरातील विविध भागात जाऊन महिलांमध्ये जनजागृती करणार आहोत. तसेच भाजप सरकारमुळे वाढलेल्या महागाई बद्दल चर्चा करणार आहोत. सामान्य माणसाच्या महिलांच्या हक्कांसाठी लढण्याचा संकल्प या करून "खर्चे पे चर्चा" या अभियानाद्वारे घरोघरी पोहोचून गरिबांना न्याय मिळेपर्यंत हा लढा सुरू राहणार आहे. असे मनोगत व्यक्त केले यावेळी माजी महिला अध्यक्ष अँड करीमुनिसा बागवान सुमनताई जाधव शोभा बोबे विणाताई देवकाते संगमित्रा चौधरी मुमताज तांबोळी चंदा काळे रुकीया बिराजदार मुमताज मदर शेख सलीम शेख अनिता भालेराव बबीता नाटके शहेनशाह मोमीन आदी महिला पदाधिकारी उपस्थित होते.

# कॉ.आडम मास्तर यांनी घेतले सीताराम येचुरी यांचे पार्थिव दर्शन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** भारताचा कम्युनिस्ट पक्ष मार्क्सवादी चे राष्ट्रीय महासचिव माजी खासदार, अर्थतज्ञ, उत्कृष्ठ संसदपटू मार्क्सवादी विचारवंत कॉ.सीताराम येचुरी यांचे दिल्ली येथील पक्षाचे केंद्रीय मध्यवर्ती कार्यालय ए. के.जी.

भवन येथे पार्थिव ठेवण्यात आले.पार्थिव दर्शनासाठी देश विदेश मधून अनेक राजकीय पक्षाचे नेते,बुद्धिजीवी, पक्ष कार्यकर्ते नेते आले आहेत.यावेळी सोलापूर मधून मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे माजी राज्यसचिव तथा माजी केंद्रीय समिती सदस्य



माजी आमदार कॉ.नरसय्या आडम मास्तर व राज्य समिती सदस्य कॉ.युसुफ शेख मेजर , श्रीनिवास म्हेत्रे आदींनी पार्थिव दर्शन घेतले व अखेरची लाल सलामी दिली.यावेळी आडम मास्तरांचे अश्रू अनावर झाले.

# एनटीपीसी लिमिटेड सोलापूर मध्ये हिंदी दिवस आणि स्वच्छता पंधरवड्याचे आयोजन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** कार्यालयीन कामकाजात तसेच दैनंदिन दळणवळणात राजभाषा हिंदीचा व्यापक प्रचार करण्याच्या उद्देशाने शनिवारी एनटीपीसी लिमिटेड सोलापूर येथे हिंदी दिन आणि स्वच्छता पखवाड्याचा उत्साहात उद्घाटन करण्यात आला. एनटीपीसी लिमिटेड, सोलापूर येथे 14 सप्टेंबर ते 29 सप्टेंबर 2024 हिंदी पंधरवडाचे आणि 14 सप्टेंबर ते 02 ऑक्टोबर, 2024 स्वच्छता पंधरवडाचे आयोजित केला जात आहे.

श्री तपन कुमार बंदोपाध्याय, मुख्य महाव्यवस्थापक, एनटीपीसी सोलापूर, यांनी हिंदी दिन सोहळ्याचे उद्घाटन केले आणि सहभागींना 'राजभाषा शपथ' आणि 'स्वच्छता प्रतिज्ञा'देण्याबरोबरच हिंदी आणि स्वच्छता पंधरवडा सुरू करण्याची



घोषणा केली. त्यांनी कर्मचाऱ्यांना अधिकृत वापरात हिंदीचा प्रचार करण्याचे आवाहन केले आणि स्वच्छतेच्या महत्त्वावर भर देत प्रत्येकाने दैनंदिन जीवनात एकेरी वापराच्या प्लास्टिकचा वापर न करण्याचे आवाहन केले. यावेळी उदघाटन कार्यक्रमास वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

CGM, सोलापूर आणि इतरांनी अधिकृत भाषेतील आवाहन जारी केले आणि प्रत्येकाला त्यांच्या दैनंदिन कार्यालयीन कामकाजात शक्य तितकी अधिकृत भाषा हिंदी वापरण्यास सांगितले. ते म्हणाले की, हिंदी भाषेमध्ये सर्व भाषांना एकत्र जोडण्याची अफाट शक्ती आहे, त्याशिवाय ती बोलणे आणि प्रत्येकाशी जोडणे सोपे आहे.

पंधरवड्यादरम्यान हिंदी प्रश्नमंजुषा, नारा लेखन, निबंध लेखन, चित्रकला स्पर्धा इत्यादी स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. वार्षिक राजभाषा कार्यक्रम आणि स्वच्छता पखवाड्यात कर्मचारी आणि त्यांचे कुटुंबीय मुलांसह सहभागी होतील अशी अपेक्षा आहे.

# राज्यघटनेबाबत जागृतीसाठी संविधान मंदिर प्रेरणादायी - उपराष्ट्रपती जगदीप धनखड

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार असून भारतीय राज्यघटना ही सर्वार्थाने वैशिष्ट्यपूर्ण आहे. भारतीय राज्यघटनेबाबत नवीन पिढीत जागृतीसाठी संविधान मंदिर नक्कीच प्रेरणादायी ठरेल, असे प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी केले. एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथे कौशल्य विकास विभागांतर्गत व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय अंतर्गत ४३४ औद्योगिक प्रशिक्षण



संस्थांमध्ये ह्यासंविधान मंदिर लोकार्पण सोहळा झाला. यावेळी उपराष्ट्रपती यांच्या पत्नी डॉ. सुदेश धनखड, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन नागपूर येथून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (ई- उपस्थित), कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा, कौशल्य विकास विभागाचे सचिव गणेश पाटील, विकास आयुक्त प्रदिपकुमार डांगे, कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. अपूर्वा पालकर, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाचे संचालक सतीश सूर्यवंशी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. मान्यवरांनी संविधान संग्रहालयाचीही पाहणी केली.

# अक्कलकोट शहरात कृत्रिम विसर्जन तलावास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद




**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** स्वच्छ भारत अभियान 2.0 आणि माझी वसुंधरा अभियान 5.0 अंतर्गत जल प्रदूषण कमी करण्यासाठी अक्कलकोट नगरपरिषदेच्या वतीने शहरातील हत्ती तलाव येथे कृत्रिम विसर्जन तलाव उभारण्यात आला आहे. पारंपरिक विसर्जन पद्धतीला छेद देत कृत्रिम तलावात विसर्जन करण्यास गणेश भक्तांचा देखील उदंड प्रतिसाद मिळत आहे. तसेच तलाव शेजारी नगरपरिषदेने पर्यावरणाचा ऱ्हास होऊ नये आणि निसगार्चा समतोल राखण्यासाठी मूर्ती दान केंद्र उभारले असून पर्यावरण प्रेमी गणेश भक्तांनी गणेश मूर्ती दान करावयात असे आवाहन मा. मुख्याधिकारी श्री. रमाकांत डाके यांनी केले आहे.

# क्रीडा संकुलात येणाऱ्या खेळाडूंना अधिकाधिक सुविधा मिळण्याच्या दृष्टीने कामे करावीत - उपमुख्यमंत्री अजित पवार

**बारामती (कटूसत्य वृत्त):** उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी बारामती परिसरात सुरु असलेल्या विविध सार्वजनिक विकासकामांची पाहणी केली; क्रीडा संकुलात येणाऱ्या खेळाडूंना अधिकाधिक सुविधा मिळतील यादृष्टीने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन गतीने कामे पूर्ण करावीत, असे निर्देश त्यांनी दिले.



श्री.पवार यांनी कन्हेरी वन विभाग, जळोची उपबाजार येथील कृषी उत्पन्न बाजार समिती इमारत, फळे व भाजी हाताळणी केंद्र, मेडद येथील शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय तसेच क्रीडा संकुल नूतन इमारत, रेशीम कोष खरेदी विक्री बाजारपेठ कोषोत्तर प्रक्रिया पथदर्शक तथा प्रशिक्षण केंद्र, गरुडबाग येथील कॅनॉलचे सुशोभिकरण, चिल्ड्रन पार्क येथे सुरू असलेल्या सार्वजनिक विकासकामांची पाहणी करुन संबंधित अधिकांऱ्याकडून माहिती घेतली. यावेळी उपवनसंरक्षक महादेव मोहिते, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उप विभागीय अधिकारी वैभव नावडकर, महावितरणचे मुख्य अभियंता अंकुश नाळे आदी उपस्थित होते

क्रीडा संकुलात मॅट फिनिशिंग असलेल्या फरशा बसवा. भिंतीच्या रंगानुसार कक्ष, कक्षातील सोफा, शौचालय आदी बाबींचा विचार करुन इलेक्ट्रिकल उपकरणे वापरावीत. पुरेसा सुर्यप्रकाश, हवा खेळती राहील याची काळजी घेऊन कामे करा.

जळोची उपबाजार येथील फळे व भाजी हाताळणी केंद्राच्या परिसरात सरळ वाढणारी, सावली देणाऱ्या प्रजातींचे वृक्षारोपण करा. कृषी उत्पन्न बाजार समिती नुतन इमारतीच्या परिसरातील रस्त्याचा विचार करुन पुरेशा उंचीच्या संरक्षक भिंती उभाराव्यात. परिसरात नागरिकांसाठी बैठक व्यवस्था करावी.

कन्हेरी वनविभागात विविध प्रजातींचे वृक्षारोपण करा. यापूर्वी लावण्यात आलेल्या झाडांचे संगोपन झाले पाहिजे, याकडे लक्ष द्यावे. लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांना चढ-उतर करण्यासाठी सोईस्कर पायऱ्या व बैठक व्यवस्था करावी. तलावातील पाणी व परिसर स्वच्छ राहील, याची दक्षता घ्यावी. परिसरात फिरतांना रस्त्याच्या बाजूला असणाऱ्या झाडाच्या फांद्यांमुळे अडथळा निर्माण होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी.

शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय तसेच गरुडबाग येथील कॅनॉलचे सुशोभिकरण, चिल्ड्रन पार्क येथील कामे लवकरात लवकर पूर्ण करावीत. रेशीम कोष खरेदी विक्री बाजारपेठ कोषोत्तर प्रक्रिया पथदर्शक तथा प्रशिक्षण केंद्राच्या नूतन इमारतीचे बांधकाम करतांना समोरील मुख्य रस्त्यापेक्षा उंच जोत्याचे बांधकाम करावे.

परिसरातील विकासकामे करताना ती गुणवत्तापूर्ण, दजेर्दार, टिकाऊ आणि वेळेत पूर्ण होतील, याकडे लक्ष द्या. कोणतीही कामं प्रलंबित राहणार नाहीत, याबाबत दक्षता घ्यावी, अशा सूचना उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी दिल्या.

# सोलापूर ग्रामीण पश्चिममधील 14 मंडल अध्यक्ष निवडीसाठी सोमवारी मुलाखती- चेतनसिंह केदार सावंत

**सांगोला (कटूसत्य वृत्त):** महाराष्ट्राच्या विधानसभेवर महायुतीचा झेंडा फडकवण्यासाठी भाजपने जोरदार तयारी केली आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सक्रिय कार्यकर्त्यांना जास्तीत जास्त प्रोत्साहन देण्यासाठी तसेच त्यांच्या खांद्यावर पक्षाची नवी जबाबदारी देण्यासाठी सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्ह्यात १४ मंडल अध्यक्षांची नियुक्ती करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने सोमवार १६ सप्टेंबर रोजी हॉटेल जोतिर्लिंग वाढेगाव नाका सांगोला या ठिकाणी माजी खासदार रणजितसिंह निंबाळकर आणि जिल्हा प्रभारी विक्रम देशमुख यांच्या उपस्थितीत नूतन मंडल अध्यक्षांची नियुक्ती करण्यासाठी मुलाखती घेण्यात येणार आहेत. तसेच भाजप पदाधिकाऱ्यांच्या जिल्हा बैठकीचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी दिली.

सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्ह्यात प्रत्येक मंडलमध्ये ३०० पेक्षा जास्त बुथ संख्या असल्याने मंडल अध्यक्षांना बूथ प्रमुखांशी वेळेत संपर्कात राहणे व वेळ देणे अडचणीत होत होत आहे. त्यामुळे राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, उच्च तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, पश्चिम महाराष्ट्र संघटन मंत्री मकरंद देशपांडे यांच्या आदेशानुसार सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्ह्यातील प्रत्येक विधानसभा मतदारसंघात तीन मंडल अध्यक्षांची नियुक्ती करण्यात येणार आहे. भाजपच्या वतीने आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्ह्यातील सांगोला, करमाळा, माढा, माळशिरस, पंढरपूर व बार्शी या विधानसभा मतदारसंघात ११५ ते १४० इतक्या बूथचे एक मंडल तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला असून सोलापूर ग्रामीण



पश्चिम जिल्ह्यात १४ मंडले तयार करण्यात आली आहेत.

सांगोला विधानसभेसाठी सांगोला उत्तर मंडलमध्ये महूद जि.प. गट, एखतपूर जिल्हा परिषद गट, जवळा जिल्हा परिषद गट सांगोला नगरपालिका, सांगोला दक्षिण मंडल मध्ये घेरडी जिल्हा परिषद गट, कडलास जिल्हा परिषद गट, चोपडी जिल्हा परिषद गट, कोळा जिल्हा परिषद गट, पंढरपूर मंडल मध्ये भाळवणी जिल्हा परिषद गट, करमाळा मंडल मध्ये करमाळा नगरपरिषद, वीट जिल्हा परिषद गट, पांडे जिल्हा परिषद गट, ग्रामीण करमाळा मंडल मध्ये कोर्टी जिल्हा परिषद गट, वांगी जिल्हा परिषद गट, केम जिल्हा परिषद गट, कुडूर्वाडी मंडल मध्ये कुर्डवाडी नगरपरिषद भोसरे जिल्हा परिषद गट, कुर्डू जिल्हा परिषद गट, म्हैसगाव पंचायत समिती गण, माढा पूर्व मंडल मध्ये माढा नगरपंचायत, मोडनिंब जिल्हा परिषद गट, उपळाई जिल्हा परिषद गट, मानेगाव जिल्हा परिषद गट, माढा पश्चिम मंडळ मध्ये टेंभुर्णी जिल्हा परिषद गट, बेंबळे जिल्हा परिषद गट व माळशिरस तालुक्यातील गावे, करकंब मंडल मध्ये करकंब जिल्हा परिषद गट, रोपळे जिल्हा परिषद गट, गुरसाळे जिल्हा परिषद गट, भोसे जिल्हा परिषद गट, माळशिरस पूर्व मंडळ मध्ये यशवंत नगर जिल्हा परिषद गट, संग्रामनगर जिल्हा परिषद गट, माळीनगर जिल्हा परिषद गट, वेळापूर जिल्हा परिषद गट, तांदुळवाडी जिल्हा परिषद गट, माळशिरस पश्चिम मंडळ मध्ये दहिगाव जिल्हा परिषद गट, फोंडशिरस जिल्हा परिषद गट, मांडवे जिल्हा परिषद गट, कन्हेर जिल्हा परिषद गट, पिलीव जिल्हा परिषद गट, माळशिरस नगरपंचायत, नातेपुते नगरपंचायत, अकलूज मंडल मध्ये अकलूज शहर आणि बार्शी ग्रामीण व बार्शी शहर अशी १४ मंडले तयार करण्यात आली आहेत. या १४ मंडळ अधीक्षक अध्यक्षांची नियुक्ती करण्यासाठी सोमवार १६ सप्टेंबर रोजी हॉटेल जोतिर्लिंग वाढेगाव नाका सांगोला या ठिकाणी माजी खासदार रणजीतसिंह निंबाळकर आणि जिल्हा प्रभारी विक्रम देशमुख यांच्या उपस्थितीत मुलाखती घेण्यात येणार आहेत. तसेच आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा कार्यकारणी व पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित केली असल्याची माहिती भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी दिली.

# ई ग्रंथालय आज्ञावली व 'ग्रंथमित्र' फलक अनावरण कार्यक्रम जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, सोलापूर येथे संपन्न

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील अ वर्ग ग्रंथालयासाठी ई ग्रंथालय आज्ञावली संदर्भात माहिती देण्याकरिता शुक्रवार दिनांक 13 सप्टेंबर 2024 रोजी सकाळी 11.30 वाजता जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय सोलापूर येथे सभा संपन्न झाली असून सदर सभेचे प्रास्ताविक ग्रंथालय निरीक्षक प्रमोद पाटील यांनी केले तर उपस्थित अ वर्ग ग्रंथालय सेवक, कार्यकर्ता व सोलापूर जिल्ह्यातील ग्रंथमित्र व्यक्ती यांचे



स्वागत जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुनील हुसे यांनी केले. यावेळी ग्रंथालय अज्ञावलीची विस्तृत माहिती प्रमोद पाटील यांनी उपस्थितांना दिली. उपस्थितांच्या प्रश्नांना उत्तरे हुसे साहेबांनी दिली. यावेळी सोलापूर जिल्ह्यातील सर्व ग्रंथमित्र व महाराष्ट्र शासनाने उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार दिलेल्या संस्थेच्या नावाच्या फलकाचे अनावरण ग्रंथमित्र दत्तात्रय बाबर ग्रंथमित्र कुंडलिक मोरे व ज्ञानेश्वर कुलकर्णी यांचे शुभहस्ते करण्यात आले. प्रत्येक जिल्ह्यातील ग्रंथमित्र व्यक्ती व संस्था यांच्या फलकाचे अनावरण जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय येथे होणार असल्याची माहिती हुसे साहेबांनी दिली हा अत्यंत स्तुत्य उपक्रम असून सोलापूर जिल्ह्यातील ग्रंथमित्रांची ओळख यामुळे जिल्ह्यातील सर्व कार्यकर्ता व सेवक यांना होणार आहे असेही त्यांनी मनोगत व्यक्त केले.

ग्रंथमित्र कुंडलिक मोरे यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केले. यावेळी दत्ता मोरे, पुनम शिंदे, वृषाली हजारे, संजय सरगर, कुमार चन्ना, ज्ञानेश्वर कुलकर्णी, प्रवीण पाठक, संतोष भोसेकर, सुरेश यादव, दत्तात्रय बाबर, प्रदीप गाडे यल्लप्पा घोडके, रणजीत भंडारे, रमा इप्पलपल्ली, विजयालक्ष्मी क्षिरसागर, प्राजक्ता वाघीरकर, किरण पाटील, चौधरी, रोहित साळुंखे, जगदीश ईमडशेट्टी यांच्यासह कार्यकर्ते व सेवक उपस्थित होते. ज्ञानेश्वर कुलकर्णी यांनी उपस्थितांचे आभार मानले.